**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२**
**जिल्हास्तरीय क्रीडांगण विकास अनुदान**
**<u>योजनेत सुधारणा.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: क्रीडाधो-३११३ /प्र.क्र. ४८/क्रीयुसे-१,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मांत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक - ०७ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u> -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/११/क्रीयुसे-१, दि.१४ जून, २०१२.
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडाधो-३११३/प्र.क्र.४८/११/क्रीयुसे-३, दि.१३ फेब्रुवारी, २०१४.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. क्रीडाधो-३११४/प्र.क्र.१६५/क्रीयुसे-१, दि.१६ ऑगस्ट, २०१४.
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. क्रीडायो ३११३/प्र.क्र.४८/१३/क्रीयुसे-३, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६.

**<u>प्रस्तावना</u> –**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ घोषित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक १४.६.२०१२ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या क्रीडा धोरणातील मुद्दा क्रमांक-४.७ (क) हा क्रीडांगण विकास अनुदान योजनेत सुधारणा करण्याबाबत आहे. त्यानुसार क्रीडांगण विकास अनुदान योजना या जिल्हास्तरीय योजनेची अनुदान मर्यादा वाढवून निकषात सुधारणा करून संदर्भ क्र.२ दि.१३ फेब्रुवारी,२०१४ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. संदर्भ क्र.३ व ४ अन्वये यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आले आहेत. या सर्व बाबीचा अंतर्भाव करून या योजनेसाठी सुधारीत नियमावलीसह सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> –**

या शासन निर्णयाद्वारे क्रीडांगण विकास अनुदान योजना या जिल्हास्तरीय योजनेची सुधारित नियमावली लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. या योजनेचा दिनांक १६.०८.२०१४ व दिनांक ३.१०.२०१६ चा शासन निर्णय व शासन शुद्धिपत्र अधिक्रमित करण्यात येत आहेत.

३. या योजनेचा लाभ देण्यासाठी शासन निर्णयासोबतची परिशिष्ट "अ" मधील नियमावली लागू राहील. सुधारित अनुदान मर्यादा व नियमावली शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहील.

४. या जिल्हास्तरीय योजनेकरिता संबंधित जिल्हयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत क्रीडांगण विकास अनुदान जिल्हास्तरीय योजनेचे जे लेखाशीर्ष उपलब्ध आहे. तेच या योजनेसाठी पुढे सुरु राहील.

५. या योजनेत प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी तपासून तांत्रिक मान्यता प्रदान करावी व पात्र संस्थांची निवड, निकष प्राथम्य क्रमाने संस्थांची यादी तयार करण्यात यावी. त्यानुसार **पात्र संस्थांना अंतिम प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.**

६. सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १९८/१४७१, दिनांक १२/१०/२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०७१५०३२३०८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Imtiyaz Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b314631 4d51ec0e87d0a6, serialNumber=77a529748c5e7c1ba7a66e81c654ba3c492fda5b29e07 6241db1ba213ddedf4e, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2019.09.07 15:08:55 +05'30'

**( इ. मु. काझी )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
२) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क,संचालनालय यांना या शासन निर्णयाची व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह.
४) आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर,
७) नियोजन विभाग (का.१४७१ व १४८१), मंत्रालय, मुंबई.
८) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
९) सर्व जिल्हाधिकारी, (क्रीडा व युवक सेवा,संचालनालयामार्फत).
१०) सर्व जिल्हा नियोजन अधिकारी यांना संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत. (क्रीडा व युवक सेवा, संचालनालयामार्फत).
११) सर्व उपसांचालक, क्रीडा व युवक सेवा (क्रीडा व युवक सेवा,संचालनालयामार्फत).
१२) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा व युवक सेवा,संचालनालयामार्फत).
१३) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन,मुंबई.
१४) मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५) निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३).

शासन निर्णय क्रमांक : क्रीडाधो-३११३ /प्र.क्र. ४८/क्रीयुसे-१, दि. ०७ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र

## परिशिष्ट – अ

## क्रीडांगण विकास अनुदान योजना बाबतची नियमावली

**नियम क्र.१ या नियमावलीस क्रीडांगण विकास अनुदान मंजूर करणे असे संबोधण्यात येईल.**

सदर नियमावली नियम शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

**नियम क्र.२ अनुदानासाठी पात्र संस्था :-**

अनुदानासाठी पात्र संस्थासाठी प्राथम्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१. स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद, कॅन्टोनमेंट बोर्ड, शासकीय रूग्णालय, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था.

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व उच्च शिक्षण विभाग यांनी मान्यता दिलेल्या शाळा व महाविद्यालये तसेच जिल्हा परिषद, आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभाग, अल्पसंख्यांक विभाग मार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा,आश्रमशाळा व वसतिगृह, शासकीय ग्रामीण रूग्णालय,शासकीय प्राथमीक आरोग्य केंद्र, शासकीय जिल्हा रूग्णालय,शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासनाद्वारे मान्यता दिलेल्या शैक्षणीक शाळा व महाविद्यालयांना **शासनामार्फत अनुदान मिळण्यास प्रारंभ होवून ५ वर्ष पुर्ण झालेले आहेत असे शाळा व महाविद्यालये** अनुदानासाठी पात्र राहतील.

३. क्रीडा विभागाच्या विविध समित्या तसेच पोलीस कल्याण निधी/ पोलीस विभाग , शासकीय कार्यालये हे अनुदानासाठी पात्र राहतील.

**नियम क्र.३ अनुदानाच्या बाबी :-**

१. क्रीडांगण समपातळीत करणे.
२. २०० मीटर अथवा ४०० मीटरचा धावनमार्ग / (Track) तयार करणे.
३. क्रीडांगणास भिंतीचे/तारेचे कुंपण घालणे.
४. विविध खेळांची एक किंवा अधिक प्रमाणित क्रीडांगणे तयार करणे
५. प्रसाधनगृह/चेजींग रुम बांधणे.
६. पिण्याच्या व मैदानावर मारण्यासाठी आवश्यक पाण्याची सुविधा निर्माण करणे.
७. क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी भांडारगृह बांधणे(निकड विचार घेऊन).
८. क्रीडांगणावर फ्लड लाईटची सुविधा निर्माण करणे.
९. क्रीडा साहित्य खरेदी करणे.
१०. क्रीडांगणावर मातीचा/सिमेंटचा भराव असलेली प्रेक्षक गॅलरी / आसन व्यवस्था तयार करणे.
११. प्रेक्षक गॅलरीवर/आसन व्यवस्थेवर शेड तयार करणे.
१२. क्रीडांगणाभोवती ड्रेनेज व्यवस्था तयार करणे.
१३. निर्मित सुविधा विचारात घेवून मैदानावर पाणी मारण्यासाठी स्प्रिंकलर यंत्रणा बसविणे व मैदानावर रोलींग करण्यासाठी हॅंड मिनी रोलर खरेदी करणे.

**<u>नियम क्र.४</u> अनुदान मंजूरीच्या अटी व शर्ती**

१. नियम क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या बाबीसाठी स्वत:च्या मालकीची किंवा दीर्घ मुदतीच्या करारावर (किमान ३० वर्ष) क्रीडांगणासाठी राखून ठेवण्यात आलेली मोकळी जमीन असणे आवश्यक आहे.

२. प्रमाणित आकाराची विविध खेळांची क्रीडांगणे तयार करण्याकरिता नियमाप्रमाणे जितकी जागा आवश्यक आहे तितकी जागा संस्थेकडे असणे आवश्यक राहील.

३. क्रीडांगण विकासासाठी शासकीय अनुदान मिळाल्यास त्या जमिनीवर क्रीडाविषयक बाबी व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

४. क्रीडांगणाच्या देखभालीवरील सर्व खर्च संबधित संस्थेस करावा लागेल.

५. शासकीय कार्यक्रमाकरिता सदरचे क्रीडांगण/मैदान विनामूल्य उपलब्ध करुन द्यावे लागेल.

६. क्रीडांगणाचा उपयोग कोणत्याही राजकीय कार्यक्रमाकरिता करण्यात येऊ नये.

७. संबंधीत बाबींवरील अनुदानाव्यतिरिक्त होणारा जादा खर्च संबंधित संस्थेस करावा लागेल.

८. क्रीडा साहित्यासाठी रू.३.०० लाख मंजूर करण्यात येतील. यामध्ये टीकाऊ व अटीकाऊ या दोन्ही प्रकारचे क्रीडा साहित्य खरेदी करता येईल. सदरचे अनुदान एक रकमी देण्यात येईल.

९. टीकाऊ साहित्यासाठी एकदा अनुदान मंजूर केल्यानंतर दर पाच वर्षाने अनुदान मंजूर करण्यात येईल व अटीकाऊ साहित्यासाठी एकदा अनुदान मंजूर केल्यानांतर दर तीन वर्षाने अनुदान मंजूर करण्यात येईल. अनुज्ञेय क्रीडा साहित्य टीकाऊ व अटीकाऊची यादी परिशिष्टामध्ये देण्यात आलेली आहे.

१०. नियम क्र.२ मध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या संस्थांना मंजूर अनुदानाव्यतिरिक्त अंदाजपत्रक व आराखडयानुसार जास्तीचा करावा लागणारा खर्च (अंदापत्रकानुसार) संबधित संस्थेने करून प्रकल्प वेळेत पुर्ण करण्याची जबाबदारी संबधित संस्थेची राहील.जिल्हा क्रीडा अधिकारी वा त्यांचे प्रतिनिधी यांनी सदर संस्थेच्या मंजूर करण्यात आलेल्या कामाच्या प्रगतीची वेळोवेळी शहनिशा करावी.

११. जिल्हा परिषद बांधकाम विभाग, खाजगी कंत्राटदार इत्यादी माध्यमांबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत क्रीडांगण संदर्भातील बांधकामे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>नियम क्र.५</u> अनुदानाचा दर व मर्यादा –**

(अ) बिगर आदिवासी भागातील संस्थांना नियम क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या क्रीडा साहित्य खरेदी करणे या बाबीं व्यतिरिक्त मान्य असलेल्या बाबीकरिता अंदाजपत्रकीय खर्चाची प्रत्यक्ष रक्कम अथवा जास्तीत जास्त रू. ७.०० लक्ष या पैकी कमी असेल इतकी रक्कम प्राप्त तरतूद विचारात घेऊन एक रकमी संस्थेस अनुदान म्हणून देण्यात यावी.

(आ) आदिवासी भागातील नियम क्र.२ मध्ये नमूद केलेल्या पात्र शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांना क्रीडा साहित्य खरेदी करणे या बाबीं व्यतिरिक्त मान्य असलेल्या बाबीकरिता अंदाजपत्रकीय खर्चाची प्रत्यक्ष रक्कम अथवा जास्तीत जास्त रू.७.०० लक्ष या पैकी कमी असेल इतकी रक्कम प्राप्त तरतूद विचारात घेऊन एक रकमी संस्थेस अनुदान म्हणून देण्यात यावी.

(इ) आदिवासी व समाजकल्याण विभागामार्फत चालविल्या जाणा-या शासकीय आश्रमशाळांना नियम क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या क्रीडा साहित्य खरेदी करणे या बाबीं व्यतिरिक्त मान्य असलेल्या बाबीकरिता अंदाजपत्रकीय खर्चाची प्रत्यक्ष रक्कम अथवा जास्तीत जास्त रू.७.०० लक्ष या पैकी कमी असेल इतकी रक्कम प्राप्त तरतूद विचारात घेऊन एक रकमी

संस्थेस अनुदान म्हणून देण्यात यावी. मात्र क्रीडा साहित्यासाठी कमाल रु. ३.०० लक्ष अनुदान मर्यादा राहील.

(ई) शासकीय विभाग शासनामार्फत होणारी क्रीडा संकुले, स्थानिक स्वराज्य संस्थांना नियम क्र.३ मध्ये नमूद केलेल्या क्रीडा साहित्य खरेदी व इतर बाबींसाठी अंदाजपत्रकीय खर्चाची प्रत्यक्ष रक्कम अथवा जास्तीत जास्त रू.७.०० लक्ष या पैकी कमी असेल इतकी रक्कम प्राप्त तरतूद विचारात घेऊन एक रकमी संस्थेस अनुदान म्हणून देण्यात यावी.

**<u>नियम क्र.६</u>   अनुदानासाठी अर्ज करण्याची पध्दत-**

अनुदान मंजुरीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज खालील कागदपत्रांसह संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

१. नियम क्रमांक २ मधील शासनाव्दारे मान्यता दिलेल्या शाळा व महाविद्यालयांना संस्था नोदंणी प्रमाणपत्र व ध्येय उद्येशासह घटनेची सत्यप्रत.

२. जमिनीच्या मालकीहक्क पुराव्यासाठी ७/१२ उतारा किंवा दीर्घ मुदतीच्या करारावर (किमान ३० वर्ष) असलेल्या जमिनीबाबत पुरावा दर्शविणारे नोंदणीकृत करारपत्र/बक्षीस पत्र/ दान पत्र असणे आवश्यक आहे.

३. शासकीय अनुदान घेण्याविषयी व संबधित बाबींकरीता शासन अनुदानाव्यतिरीक्त अंदाजपत्रकातील जास्तीची रक्कम खर्च करण्याविषयी संस्थेच्या/शासकीय कार्यालयाचे ठरावाची सत्यप्रत.

४. नियम क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या बांधकामास ग्रामपांचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यांची परवानगी असल्याचे प्रमाणपत्र तसेच संबंधीत बाबींचे खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागातील उप अभियंता किंवा नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषदेतील सक्षम अभियंता / नोंदणीकृत अभियंता / मान्यता प्राप्त आर्किटेक्ट यांनी मान्य केलेले असावे. क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी अधिकृत पुरवठारादाचे खर्चाचे अंदाजपत्रक सादर करणे बंधकारक राहील.

५. संस्थेकडील एकूण जमिनीपैकी क्रीडांगणासाठी राखून ठेवलेल्या जमिनीबाबतचे हमीपत्र.

६. संबधित अर्जदार संस्थेस प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे ही संस्थेशी संबधित व खरी असल्याबाबत तसेच प्रकल्प पूर्ण करण्याबाबत हमीपत्र.

७. संस्थेचा शाळेचा क्रीडा स्पर्धेत सहभागाबाबतचा गत दोन वर्षाबाबतचा अहवाल.

८. शासन अनुदाना व्यतिरीक्त अंदाजपत्रक व आराखडयानुसार करावा लागणारा जास्तीचा खर्च संबधित संस्थेस करावा लागेल.

**<u>नियम क्र.७</u> अनुदान मंजुरीचे तसेच आहरण व संवितरण अधिकार -**

उपरोक्त नियमांच्या अधिन राहून अनुदान मंजूर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना प्रदान करण्यात येत असून आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**<u>नियम क्र.८</u>   नियमात बदल/शिथिल करण्याचे अधिकार-**

सदर नियमात अंशतः/पूर्णतः बदल किंवा नियम शिथील करण्याचे अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभागास राहतील.

-------

*शासन निर्णय क्रमांक : क्रीडाधो-३११३ /प्र.क्र. ४८/क्रीयुसे-१, दिनांक ०७ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र*

## परिशिष्ट - ब

## क्रीडा साहित्याची यादी

| अ.क्र | क्रीडा प्रकार | टिकाऊ क्रीडा साहित्य | अटिकाऊ क्रीडा साहित्य |
|---|---|---|---|
| १ | ॲथलेटिक्स | थाळी, गोळा, मार्कींग कोन, स्टार्टींग ब्लॉक्स, रिले बॅटन्स, हर्डल्स, लांब उंच उडी व पोल व्हॉल्ट टेक ऑफ बोर्ड, हायजंप व पोल व्हाल्ट पीट, गोळा टो बोर्ड, हर्डल्स, स्टार्टर रोस्ट्रम, स्टॉप वॉच, स्टार्टींग गन, जजेस स्टँड, फीनिशिंग पोल, व्हिक्ट्री स्टँड, हॅमर, लॅप स्कोअरिंग बेल, हॅमर केज, इ. | भाला, ॲथलेटिक्स, हाय जंप वि पोल व्हॉल्ट क्रॉस बार, स्पाईक, मेजरिंग टेप, पोल व्हॉल्ट (बांबू/फायबर) इ. |
| २ | फुटबॉल | गोलपोस्ट. | फुटबॉल, गोलकिकपर ग्लोव्हज, कोन, फूटबॉल नेट, कॉर्नर फ्लॅग, रेफ्री फ्लॅग, किकिंग बोर्ड, शिनगार्डस इ. |
| ३ | हॉकी | गोलपोस्ट. | हॉकी गोलकिपर किट, हॅण्डग्लोव्हज, हॉकी टर्फ बॉल, प्रॅक्टिस नेट, स्टीक केस, हॉकी स्टीक, कार्बन, फायबर ग्लास, हिटिंग बोर्ड, शिन गार्डस, इ. |
| ४ | टेनिस | लॉन टेनिस पोल- स्लीव्हज सहीत इ. | टेनिस बॉल, टेनिस नेट. रॅकेटस् |
| ५ | बॅडमिंटन | बॅडमिंटन पोल | बॅडमिंटन नेट, बॅडमिंटन शटल. |
| ६ | वेटलिफिटंग/ पॉवर लिफिटंग | रबर कोटेड बारबल सेट, वेटलिफ्टींग प्लॅटफॉर्म इ. | वेटलिफ्टींग बेल्ट |
| ७ | कुस्ती | कुस्ती मॅट सेट, (१२ X १२ मी. सिंथेटिक कव्हरसह). | |
| ८ | व्हॉलिबॉल | व्हॉलिबॉल पोल, ॲण्टीना फायबरग्लास, | व्हॉलिबॉल, व्हॉलिबॉल नेट, |
| ९ | खो-खो | खो-खो पोल. | |
| १० | बॉक्सिंग | बॉक्सिंग रिंग, पंचींग पॅड. | ग्लोव्हज, टेन ऑन्स रेड ब्ल्यू, पंचींग बॅग, हेड गिअर रेड ब्ल्यू, पंचिंग ग्लोव्हज. |
| ११ | रस्सीखेच | १.५ इंच रस्सी | |

| अ.क्र | क्रीडा प्रकार | टिकाऊ क्रीडा साहित्य | अटिकाऊ क्रीडा साहित्य |
|---|---|---|---|
| १२ | हॅण्डबॉल | हॅण्डबॉल गोल पोस्ट, | हॅण्डबॉल नेट |
| १३ | जलतरण | किक बोर्ड, आर्म फ्लोट लेन, फ्लोट लेन, डायव्हिंग बोर्ड, डायव्हिंग बोर्ड स्टॅण्ड, | पाम पुलर, पूल बॉय, लाईफ जॅकेट, बॅरल फ्लोट, लाईफ बॉय. |
| १४ | जिम्नॅस्टिक्स | बॅलंसिंग बिम, अन इव्हन बार, हॉरिझॉन्टल बार, पॉमेल हार्स, पॅरलल बार, रोमन रिंग, व्हॉल्टिंग टेबल, जिम्नॅस्टिक्स बेंचेस, बीट बोर्ड- फाईव्ह स्प्रिंग, थ्री स्प्रिंग, वॉल वॉर्स फॉर टू सेक्शन, मशरुम हॉर्स, स्पेअर पॉमेल,ट्रॅम्पोलिन, फ्लोअर एक्झरसाईज मॅट. | रिदमीक साहित्य, (रोप, बॉल, रिबन, क्लब), स्पॉटींग बेल्ट, फ्लोअर बेल्ट. |
| १५ | कबड्डी | सिंथेटिक मॅट | |
| १६ | बास्केटबॉल | पोल | बास्केटबॉल, बास्केटबॉल नेट |
| १७ | टेबल टेनिस | टेबल टेनिस टेबल, रोबो (मल्टीप्रोग्राम) | रॅकेटस, बॉलस |
| १८ | ज्युदो, तायक्वांदो | मॅट | |
| १९ | मल्लखांब | रोप, पोल | |
| २० | शुटिंग | इलेक्ट्रॉनिक पुली, इलेक्ट्रॉनिक टार्गेट, एअर रायफल,एअर पिस्तल, लाईट स्टँड, रायफल स्टँड, | एअर पॅलेट |
| २१ | तिरंदाजी | तिरंदाजी खेळासाठी पूरक साहित्य | |
| २२ | क्रिकेट | | क्रिकेट मॅट, क्रिकेट किट |
| २३ | स्केटिंग | | स्केटस |